MHNS180014362015

**<u>नि.दि.दावा क्र.९९/२०१५ मधील निशाणी क्र.७८ वरील आदेश</u>**

**(जिजाबाई राउत वि. अशोक गावीत)**

वादीने प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०६ नियम १७ नुसार मुळ दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

०२. वादीचे असे कथन आहे की, वादीने प्रतिवादी विरूध्द ठरावाचा, वाटपाचा व निरंतर ताकीद व कब्जाचे मागणीसाठी दावा दाखल केलेला आहे. वादीने सदर दाव्यात वाटपाकामी मिळकतींचे वर्णन दाखल केलेले आहे. परंतु वडीलोपार्जित मिळकतीचे उत्पन्नातुन प्रतिवादी नं.१ यांचे नावे खरेदी घेतलेली मौजे सिध्दार्थनगर, ता.कळवण, येथील गट क्र.६७/१ व ६७/२ या मिळकतींबाबत मुळ वादी जिजाबाई राउत यांचेकडुन अज्ञानपणाने व नजरचुकीने दाव्यात उल्लेख करणे राहिलेले आहे. वादी व प्रतिवादी नं.१ व २ यांची वडीलोपार्जित शेत मिळकत व त्याबाबतचा मजकुर सदर दाव्यात समाविष्ट करणे व त्या अनुषंगाने दाव्यात दुरूस्ती होणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीस प्रस्तुत अर्जातील परिच्छेद क्र.०२ मधील मजकुर मुळ दाव्यात समाविष्ट करुन दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

०३. वादीचे पुढे कथन असे की, दावा कलम १ मध्ये १–ड नंतर १–इ असा नविन नंबर देवुन त्यामध्ये नमुद वडीलोपार्जित शेत मिळकतीचा अनुषंगाने

प्रस्तुत अर्जातील परिच्छेद क्र.०३ मधील मजकुर १–इ मुळ दाव्यात समाविष्ट करुन दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

०४. वादीचे पुढे कथन असे की, दावा कलम ४ नंतर ४ अ, ब व क असे नविन नंबर देवुन त्यामध्ये नमुद वडिलोपार्जित मिळकतीबातची खरी संपुर्ण माहिती बाबत प्रस्तुत अर्जातील परिच्छेद क्र.०४ मधील मजकुर ४अ, ४ब व ४क हा मजकुर मुळ दाव्यात समाविष्ट करुन दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

०५. अर्जदाराचे पुढे कथन असे की, प्रस्तावीत दुरूस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरूपात कुठल्याही प्रकारचा बदल होत नाही किंवा दाव्यावर कुठल्याही प्रकारचा विपरीत परिणाम होणार नाही आणि प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०६. प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्जाला नि.क्र.८० प्रमाणे जबाब दाखल करुन अर्जाला प्रखर विरोध दर्शविला आहे. प्रतिवादीचे कथन असे की, सदर दावा वादीने २०१५ साली दाखल केला आहे. त्यात वादीचा पुरावा तसेच उलट तपास झाला आहे व प्र.वादीच्या पुराव्यावर दावा आहे. त्यात वादीने दोन तीन वेळा दाव्यात दुरुस्ती केलेली आहे. त्यात वादीने घरासंबंधी दुरुस्ती केली तेव्हा वादीला संपूर्ण मिळकतीची माहीती असतांना दाव्यात मिळकती सामील केल्या नाहीत व केवळ दाव्याचे कामकाज लांबणीवर पाडीत आहे. त्यांचे पुढे कथन असे की, सदर ग.नं६७/१ व ६७/२ हया मिळकती वडीलोपार्जीत नाहीत, त्या प्र.वादीने त्याच्या स्वतःच्या कष्टयाच्या पैशाने कमाईने विकत घेतल्या आहेत. प्र.वादी क्र.०१ च्या वडीलांकडे वडीलोपार्जीत मिळकतच नव्हती फक्त सरकार तर्फे फॉरेस्ट प्लॉट म्हणुन त्याचे उदरनिर्वाह करण्याकरीता जमिन दिलेली होती व ती डोंगराच्या पायथ्याशी जिराईत मिळकत तेव्हा होती. सदर मिळकतीतुन जेमतेम

एकच पिक यायचे व त्याच्यावर ते उदरनिर्वाह करायचे. सदर मिळकत वडीलोपार्जीत नव्हती. त्यांचे पुढे कथन असे की, ग.नं.६७/१ व ६७/२ हया मिळकती प्र.वादी नं.०१ ने रोजगार हमी योजनेवर तो व त्याची पत्नी अंगणवाडी मध्ये सर्विसला होती व ते पैसे जमवुन व काही उसनवार पैसे घेवुन ती मिळकत त्याने स्वतंत्र विकत घेतली आहे व त्या मिळकतीत एकत्र कुटूंबाच्या मिळकतीतील उत्पन्नाचा काहीही संबंध नाही. सदर मिळकत प्र. वादी नं.०१ ची स्वतंत्र मिळकत आहे. त्यामुळे वादीला हया दाव्यात त्या मिळकतीचा दावा दुरुस्त करुन मागण्याचा कुठलाही कायदेशिर अधिकार नाही व तशी मागणी वादीला करता कायदयाने करता येणार नाही, त्या मिळकतीशी वादीचा काहीही व कसलाही संबंध नाही. त्या मिळकतीत वादीला वाटप करुन मागण्याचा कुठलाही कायदेशिर हक्क नाही केवळ प्र.वादीला त्रास देण्यासाठी हया मिळकतीत वाटप मागत आहे. वादीला दावा दुरुस्तीचा अर्ज कायदयाला धरुन नाही व तसा अर्ज करण्याचा वादीस कुठलाही हक्क व अधिकार नाही. सदर मिळकतीमुळे मुळ दाव्याचे स्वरुप बदलेल, तसेच प्र. वादींचे अपरिमित असे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे वादीने दावा दुरुस्तीसाठी केलेला अर्ज हा बेकायदेशिर असुन सदर अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

०७. वादींचा अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०८. कायदयाने जर प्रस्तावीत दुरुस्ती करणे आवश्यक असेल व त्यामुळे पक्षकारांमधील वादाचे गुणवत्तेवर निराकरण करणे सोयीस्कर होत असेल, तसेच सदर दुरुस्तीमुळे जर दाव्यातील गुंतागूंत सोडविणे शक्य होत असेल, तर अशा प्रकारची दुरुस्ती करण्यास परवानगी मंजुर करणे योग्य व न्यायोचीत होईल.

सर्वसाधारणपणे दाव्यातील इतर पक्षकाराचे नुकसान होणार नाही या बाबीची काळजी घेउन प्रस्तावीत दुरुस्ती करण्यास मंजुरी देणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्ज दिनांक २७.०१.२०१६ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदर दाव्यातील वाद हा मिळकती संबंधाने असुन पक्षकारांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. प्रस्तावीत दुरुस्तीमुळे दावा योग्यतेवर निकाली काढणे सोईस्कर होईल व दाव्यामध्ये गुंतागुत निर्माण होणार नाही. प्रस्तावीत दुरुस्तीमुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच दाव्याचे स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. सत्य परिस्थिती न्यायालया समोर येण्यासाठी प्रस्तावीत दुरुस्तीची मंजुरी देणे योग्य होईल. सबब वादीचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

०१. वादींचा अर्ज मंजुर करण्यांत येतो.

०२. वादीने पुढील तारखेपर्यंत दाव्यात दुरुस्त करुन दुरुस्ती प्रत दाखल करावी.

०३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही

MEGHARAJ VAMANRAO JAWALE

Digitally signed by MEGHARAJ VAMANRAO JAWALE
Date: 2026.04.28 13:57:00 +0530

दिनांक – २८.०४.२०२६

( एम.व्ही.जावळे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कळवण.